**सन २०१९-२० करिता विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत CCD NGO- formation of FPOs in Yavatmal district so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently or better price realization. या योजनच्या मार्गदर्शत सुचनांस मंजुरी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: विकेस-२०१९/प्र.क्र.८४/का १९**
**मंत्रालय, मुंबई- ४०००३२**
**तारीख:- १३/०९/२०१९**

**संदर्भ:-**

१. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१९-Grants,दि.११/०३/२०१९

२.आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०१९ /प्र.क्र.६३/का.-१९ , दि.५/०८/२०१९ व दि.३१.०८.२०१९

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाकडून विशेष केंद्रिय सहाय्य अंतर्गत अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते. केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते . या योजनाअंतर्गत प्राप्त होणा-या अदानासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प कार्यालय, अशासकीय/ सामाजिक /खाजगी संस्था यांना आदिवासी विकास विभागाकडून आवाहन करण्यात आलेले होते. यानुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी व निवड प्रक्रिया राबवून निवडक प्रस्ताव मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीकडे सादर करण्यात आले.सदर प्रस्तावामध्ये Centre for Collective Development NGO संस्थेच्या प्रस्तावाचा समावेश आहे.

२. आदिवासी विकास विभागाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समिती व शासनाच्या मान्यतेने सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जनजाति कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे प्रकल्प मूल्यमापन समितीची Project appraisal committee ( PAC) बैठक दिनांक- १२/०२/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीत केंद्र शासनाने विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत एकूण रु ११५२९.०९ लक्ष निधीच्या प्रस्तावांना मान्यता प्रदान केलेली आहे. सदर मान्यतेनुसार २०१९-२० व सन २०२०-२१ करिता "CCD NGO- formation of FPOs in Yavatmal so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization." या योजनेसाठी रु.२००० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

३. राज्यात सद्यस्थितीत आदिवासी शेतकरी त्यांचे शेती उत्पादन वैयक्तिकरित्या व्यापाऱ्यांना किंवा जिनिंग मिल यांना विक्री करतात. याकरिता सहकारी तत्त्वावर एकत्रितपणे सामूहिक विकास केंद्राचे मदतीने

सदर शेत मालाचे उत्पादन विक्री केल्यास आदिवासी शेतकऱ्यांना चांगली किंमत/भाव मिळून फायदा होऊ शकतो.

४. सहकारा मित्र संस्था (center for collective development) या संस्थेसमवेत चर्चा करून सामूहिक विकास केंद्र स्थापन करणेकरिता प्राथमिक सर्वेक्षणासाठी र.रु.१० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला. त्यानुसार संस्थेने यवतमाळ जिल्ह्यात सर्वेक्षण करून पांढरकवडा (केळापुर), झरी - झामनी व घाटंजी या तालुक्यातील तुर, सोयाबीन व कापूस (cotton) इ.प्रमुख शेती उत्पादने असून सद्यस्थितीत वैयक्तिकरित्या, स्वतंत्रपणे प्रत्येक शेतकरी आपल्या मालाची विक्री व्यापाऱ्यास किंवा जिनिंग मिलला करतात. यामध्ये त्यांच्या शेतमालाचे वजन कमी प्रमाणात दर्शवून तसेच माल उत्तम प्रतीचा असून देखील कमी प्रतीचा असल्याचे भासवून योग्य किंमत/मोबदला अदा करण्यात येत नाही. पर्यायाने आदिवासी शेतकऱ्यास त्यांच्या चांगल्या प्रतीच्या मालासाठी योग्य वजन व भाव प्राप्त होत नसल्याने नुकसान सहन करावे लागते.

५. याकरिता सीसीडी (CCD NGO) ही शबरी आदिवासी विकास महामंडळा समवेत काम करून, आदिवासी शेतकऱ्यांना एकत्र करून शेतकऱ्यांची सहकारी संस्था/सामूहिक विकास केंद्र स्थापन करेल. यामुळे आदिवासी शेतकरी सहकारी संस्थेतील शेतक-यांना प्रक्रिया व पॅकेजिंग इत्यादी करिता मदत मिळू शकेल आणि त्यांच्या एकत्रित जमा केलेल्या शेत उत्पादनांची विक्री चांगल्या योग्य भावाने होईल. शेतकरी सीसीडी च्या मदतीने योग्य निर्णय घेऊ शकतील पर्यायाने त्यांची फसवणूक होणार नाही. सीसीडीने अशा प्रकारचे कामकाज आदिलाबाद जिल्ह्यातील सुमारे ८,००० आदिवासी शेतकऱ्यांकरीता केले असून त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे संस्थेने नमूद केले आहे.या संस्थेमार्फत सेंद्रिय शेतीबाबतचा फार्म-वेदा हा ब्रँण्ड तयार करण्यात आलेला आहे.

५. आदिवासी विकास महामंडळाकडे तुर प्रक्रिया मिल, गोडाऊन, ट्रकस्, खुली जागा, कार्यालयाकरिता जागा इ.सुविधा उपलब्ध आहेत. आदिवासी शेतकरी केंद्र हे सीसीडी संस्थेच्या सहकार्याने या उपलब्ध सुविधा भाडेतत्त्वावर घेतील व स्वतःच्या फायद्यासाठी काम करतील. आदिवासी विकास महामंडळाच्या पायाभूत सुविधा व यंत्रसामग्री वापरली जाईल आणि म्हणूनच त्यांची देखभाल व्यवस्थित होवून भाडे देखील प्राप्त होईल.

**शासन निर्णय** -

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा (केळापुर), झारी -जामनी, घाटंजी या तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था या सहकारा मित्र संस्था (centre for collective development) सामूहिक विकास केंद्राचे मदतीने व सहकार्याने स्थापन करून आदिवासी शेतकऱ्यांचे शेती उत्पादनास योग्य प्रत व भाव मिळविण्याची योजना " CCD NGO - formation of FPOs in yavatmal district so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization" ही योजना सीसीडी एनजीओ (CCD- NGO) सहकारा मित्र संस्था हैदराबाद व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक -१ नुसार मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेचे या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतुदीच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरित कार्यवाही शासनातर्फे व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नासिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१३२२३९५६२०२४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.10.07 15:28:15 +05'30'

**( संतोष जाधव )**

**कार्यासन अधिकारी**

**प्रत,**

१. मा. मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय ,मुंबई .
४. आयुक्त ,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
६. व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक.
७. सहसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर.
१०. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प .
११. प्रतिनिधी ,ट्रायफेड
१२. संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ
११. सहकारा मित्र संस्था, हैदराबाद यांचे प्रतिनिधी.
१२. संगणक समन्वयक, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई .

## विशेष केद्रीय सहाय्य अंतर्गत मंजुर योजना योजना (सन २०१९-२०)

### परिशिष्ट -१

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>CCD NGO- formation of FPOs in yavatmal so as to leverage the benefits so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization</td></tr>
<tr><td>२.</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभक्षेत्र</td><td>यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा (केळापूर), झरी-झामणी आणि घाटंजी इ. तालुके.</td></tr>
<tr><td>३.</td><td>वित्तीय तरतूद</td><td>
<table>
<tr><th>अ .क्र.</th><th>वर्ष</th><th>योजना</th><th>निधी (रु. लक्ष)</th></tr>
<tr><td>१</td><td>२०१९-२०</td><td>CCD NGO formation of FPOs in yavatmal so as to leverage the benefits so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization</td><td>५००.००</td></tr>
<tr><td>१</td><td>२०२०-२१</td><td>CCD NGO formation of FPOs in yavatmal so as to leverage the benefits so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization.</td><td>१५००.००</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>२०००.००</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>४</td><td>योजना राबविणारी यंत्रणा</td><td>व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक व सहकारा मित्र संस्था( CCD NGO) हेद्राबाद</td></tr>
<tr><td>५</td><td>नियंत्रण अधिकारी</td><td>व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक व सल्लागार समिती</td></tr>
<tr><td>६</td><td>योजनेचा उद्देश हेतू</td><td>आदिवासी शेतकरी उत्पादकांच्या शेतमालास सामूहिक विकास केद्रांचे सहाय्याने शेतमाल एकत्रित करुन योग्य प्रत, वजन व भाव मिळवून देणे.</td></tr>
<tr><td>७</td><td>योजना अंमल बजावणी कार्यपध्दती</td><td>• योजनेच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक व सहकारा मित्र संस्था( CCD NGO) हेद्राबाद यांच्यामध्ये सामंजस्य करार करतील व मंजुर तरतुदीच्या मर्यादेत प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक अंमलबजावणी यंत्रणेसोबत विचारविनिमय करून अंतिम करतील.<br>• सदर योजनेसाठी मुल्यमापन व सनियंत्रणासाठी लागणारा निधी योजना खर्चाचे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांनी करावी.<br>• सदर योजना राबबिवण्याबाबतचे वर्षनिहाय,कालबध्द कार्यक्रम निश्चित केल्यानुसार</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संयुक्तपणे व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक व योजना राबविणा-या यंत्रणेची राहील.<br>• योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने लागणारे मनुष्यबळ व त्यांची निवड करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>• सीसीडी त्यांचा पुर्वानुभव वापरुन क्षेत्रीय सहयोगी गट तयार करुन त्यांना आदिवासी शेतकीर उत्पादकांना सामुहिक सहकारी विकास केंद्रांचे फायदे समजावून सांगणेकरिता प्रशिक्षण देतील<br>• सीसीडी सुमारे १०० आदिवासी गावे लक्ष्य करेल प्रत्येक खेडयाचे स्वत:ची सहकारी संस्था असेल मग त्यांचा एक महासंघ असेल ज्यात प्रत्येक गावाचे सहकारी संस्थेचे दोन प्रतिनिधी असतील.<br>• सीसीडी महासंघाचे (फेडरेशन) पदाधिकारी नेमण्यासाठी निवडणुका घेईल त्यामध्ये अध्यक्ष,सचिव, महाव्यवस्थापक आणि संचालक मंडळ एकूण १२ सभासद असतील.<br>• क्षेत्रीय सहयोगीने सहकारी संस्थेतील सदस्यांना संघटित करुन अधिकधीक खेडयांमध्ये सहकारी संस्था सामूहिक विकास केंद्र तयार करुन जेव्हा कापणी हंगाम होईल तेव्हा गुणवत्ता साठवण आणि वाहतूक इ.बाबी सुनिश्चित करणे.<br>• कापसाचे बाबतीत सीसीडी जिनींग मिल भाडेपट्टयाने मिळविणेबाबत शोध घेईल किंवा चांगला दर मिळाल्यास थेट कापूस विक्री करण्यात येईल. याबाबतची सर्व निर्णय महासंघासमवेत (फेडरेशन) चर्चा करुन घेण्यात येतील.<br>• तुरच्या बाबतीत आपण त्यावर पुन्हा प्रक्रिया करु शकतो किंवा बाजारभाव पाहून फायद्याच्या दृष्टीने थेट विक्री करु शकतो.<br>• सीसीडी उत्तम प्रतीच्या खते व चांगले उत्पादन देणा-या बी-बियाणांबाबतची माहिती महासंघास देईल तसेच पाणी व्यवस्थापन व इतर संबंधित क्षेत्रात काम करेल.<br>• जेव्हा पीक उत्पादन होते तेव्हा सीसीडी महासंघास बरोबर घेऊन शेतक-यांचे हित लक्षात घेऊन प्रकिया उद्योग, व्यापारी, कॉर्पोरेटस यांच्यासमवेत बोलणी करुन शेतक-यांना सर्वोत्तम भाव मिळवून देण्याकरिता मदत करेल.<br>• सीसीडी खरेदी विक्री व्यवहाराच्या नोंदी व लेखे ठेवण्यास महासंघास (फेडरेशन) मदत करेल.<br>• महामंडळ पांढरकवडा येथील तूर मिल व गोडावून महासंघास (फेडरेशन) मदत करेल.<br>• महामंडळ पांढरकवडा येथील तूर मिल व गोडावून महासंघास वापरण्यासाठी भाडेपट्टयाने विहित अटी शर्ती नुसार उपलब्ध करुन देईल.<br>• महासंघ (फेडरेशन) त्यांच्या अंतर्गतच्या सर्व संस्था व त्यांचे सभासद सामुहिक विकास केंद्र योजनेमध्ये प्रत्यक्ष सहभागी होतील याबाबत खबरदारी घेईल.<br>• प्रथम वर्षी ३०००० क्विं. कापूस साठवणुकीचे उद्दीष्ट असून त्याकरिता अंदाजे रु. १६ कोटी इतकी रक्कम अपेक्षित असून खेळते भांडवल रु. ४ कोटी आवश्यक आहे. कापूस कामाबरोबरच तूर व सोयाचे काम देखील करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ८ | योजनेच्या अटी व शर्ती | ➢ योजना अंमलबजावणीकरिता उभय पक्षात सामंजस्य करार(MOU) करण्यात येईल.<br>➢ प्रथम वर्षी केलापूर ब्लॉकमध्ये अंमलबजावणी सुरु करण्यात येऊन द्वितीय वर्षापासून अन्य म्हणजेच झरीजामणी व घाटंजी या ब्लॉकमध्ये अंमजबजावणी करण्यात येईल.<br>➢ संस्थेसोबत करण्यात येणा-या सामंजस्य करारामधील सविस्तर अटी व शर्ती नुसार योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेची असेल.<br>➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल.<br>➢ प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा.<br>➢ प्रकल्प राबवितांना आवश्यक असणारे प्रशिक्षण/कार्यशाळा व प्रात्यक्षिके संस्थेद्वारे देणे बंधनकारक असेल.<br>➢ योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ तसेच शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>➢ अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.<br>➢ सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs हे www.stcmis.gov.in/smis या वेबसाईट वर अपलोड करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी यांची राहील. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल. |
| ९ | सल्लागार व मूल्यमापन सनियंत्रण समिती | समावेशक आणि सामुहिक विकास केंद्रांचे दिर्घकालीन धोरण व निर्णयास्तव खालीलप्रमाणे मुल्यमापन व सनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.<br>• प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, - अध्यक्ष<br>• आयुक्त,आदिवासी विकास ,नाशिक - सदस्य<br>• व्यवस्थापकीय संचालक,शबरी. आ. वि. व वि. मं. - सदस्य<br>• महाव्यवस्थापक(विपणन) म रा आ वि मं मर्या. - सदस्य<br>• महाव्यवस्थापक (लेखा) म. रा. आ. वि. म.मर्या. - सदस्य<br>• ट्रायफेड प्रतिनिधी - सदस्य<br>• अप्पर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती - सदस्य<br>• विषय तज्ञ - आमंत्रित सदस्य<br>• CCD-NGO संस्था प्रतिनिधी - सदस्य<br>• प्रादेशिक व्यवस्थापक, यवतमाळ - सदस्य सचिव |

| | | |
|---|---|---|
| | | **<u>सल्लागार व नियंत्रण समितीची कार्ये:-</u>**<br>सदर समिती योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुंषगाने मूल्यमापन व संनियत्रण समिती म्हणून काम करेल. प्रगती पथावर असलेल्या कामकाजाचा आढावा घेंण्याकरिता सल्लागार समितीची तीन महिन्यातून बैठक घेण्यात येईल. याशिवाय सल्लागार समिती वेळोवेळी उद्भवणा-या समस्या दूर करण्यासाठी योग्य तो सल्ला देतील.<br>➢ समितीमध्ये आवश्यकतेनुसार सदस्य/तज्ञ यांना समाविष्ट करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांना राहतील. |
| १०. | अंमलबजावणी कालावधी | ५ वर्षे |
| ११. | निधी वितरणाची कार्यपध्दती | सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे .<br>• सदर योजनेचा निधी आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांचेमार्फत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांना वर्ग करण्यात येईल.<br>• सदर निधी प्राप्त होताच व्यवस्थापकीय संचालक,शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक हे अंमलबजावणी यंत्रणेला कार्यारंभ आदेश देवून योजनेच्या सुरुवातीला २५ टक्के इतका निधी वर्ग करतील.<br>• सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल.<br>• प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ३ महिने झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार व सल्लागार समितीच्या अहवालानुसार व समाधानकारक शिफारस केल्यानंतर टप्प्याटप्याने दर तिमाहीस पुढील २५ टक्के रक्कम अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत करण्यात येईल.<br>• उपरोक्त नमूद वर्ष निहाय निधी वितरणाची कार्यपद्धती ५ वर्षासाठी राबविण्यात येईल.<br>• संबंधित यंत्रणेने कार्यपूर्ण झाल्यानंतर आवश्यक असलेले कार्यपूर्णता व निधी विनियोग प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच निधी वर्ग करण्यात येईल.<br>• योजनेच्या अनुषंगाने आऊटसोर्सिंग करण्यात येणारे कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.<br>• योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल (कर्मचा-यांचे मानधन, प्रवास,भोजन व इतर खर्च, प्रशिक्षणाचा खर्च तसेच इतर तत्सम खर्च) वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. |
| १२ | योजनेची फलनिश्चपती | ➢ आदिवासी शेतकरी उत्पादकांच्या शेतमालास सामूहिक विकास केद्रांचे सहाय्याने शेतमाल एकत्रित करुन योग्य प्रत, वजन व भाव मिळवून देणे व उत्पन्नवाढ करणे |